## नावीन्यपूर्ण उपक्रम (सुकर जीवनमान Ease of Living)

**<u>वर्धा जिल्ह्याच्या आजूबाजूच्या परिसरातील शेतांमध्ये विहिरी खोदण्याचा उपक्रम</u>**

- **<u>पूर्व स्थिती :</u>** ५-१५ एकर शेतजमिन असलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून विहीर खोदण्यास आर्थिक साहाय्य मिळू शकत नाही. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना शेत सिंचनाची अडचण निर्माण होत होती.

- **<u>सुधारित स्थिती :</u>** उपरोक्त शेतकऱ्यांची अडचणीची दखल मातृ संस्था शिक्षा मंडळ वर्धा द्वारे घेण्यात आली व ४५० विहिरी खोदण्याचे उद्दिष्ट ठेऊन आमच्या संस्थेतील अधिव्याख्यातांची चमू व मातृ संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नांती आता पर्यंत ५२ विहिरी खोदण्याचा उपक्रम साध्य करण्यात आला. आजूबाजूच्या गावातील हा उपक्रम अत्यंत माफक शुल्क (१०%) घेऊन करून देण्यात येत आहे. एकंदरीत हा उपक्रम वरदान ठरत असल्याचे शेतकऱ्यांच्या प्रतिसादावरून कळत आहे. तसेच या उपक्रमा मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने जमिनीतील पाणी कसे शोधावे याबाबतचे प्रशिक्षण देण्याचा संस्थेचा मानस आहे.






**(Arvi-Wardha Highway) रस्त्यावरील खड्डा बुजवण्याचा  उपक्रम.**

- **पूर्व स्थिती :** संस्थेच्या जवळ असलेल्या जुना पाणी चौक (Arvi-Wardha Highway) रस्त्यावर बऱ्यापैकी रहदारी असते व या रस्त्यावर चित्रात दाखवलेल्या प्रमाणे cement उखडल्यामुळे मोठा खड्डा पडला होता ज्यामुळे रहदारीस वाहनांना अडचण निर्माण होत होती.
- **सुधारित स्थिती :** उपरोक्त अडचणीची तसेच संभावित अपघाताची दखल संस्थेतील स्थापत्य विभागातील अधिव्याख्याते सौ. एस. जि. कोरडे व श्री. एन. डी. बरैया यांनी व विद्यार्थांनी घेतली व शासनाच्या संबंधित विभागाचे रीतसर परवानगी मिळवून व concrete भरून खड्डा बुजवण्यात आला. त्यामुळे रहदारी सुरळीत झाली असून अपघातांची शक्यता कमी झालेली आहे.

**पूर्वीची स्थिती**



**आताची स्थिती**



- संस्थेच्या पुढाकाराने शिक्षामंडळा अंतर्गत इतर ४ संस्थांनी मिळून वाढते अपघात लक्षात घेता मातृ संस्था शिक्षा मंडळ यांचे मार्फत शासनाकडे "Speed Breaker" लावण्याबाबत आवेदन शिक्षा मंडळ यांना पुढील कार्यवाही करिता दि. १८/०३/२०२५ रोजी सादर करण्यात आलेले आहे.
- **पूर्व स्थिती** : कर्मचाऱ्यांना मध्ये स्वतःच्या आरोग्याबद्दल जागरूकता अल्पशी होती .
- **सुधारित स्थिती** :"संस्थेच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) च्या वतीने Masmo Care Health Centre यांचे चमू द्वारे कर्मचाऱ्यांसाठी दि. 26/07/2024 रोजी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. त्यामुळे बरेच कर्मचारी स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक झालेले आहेत.

